स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदडेच्या मानव्यविद्या शाखेअंतर्गत इतिहास या विषयातील पीएच. डी. पदवी नोंदणीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोध प्रबंधाचा आराखडा

"औरंगाबाद जिल्ह्यातील अ, ब, क, श्रेणी प्राप्त पर्यटन स्थळांचा चिकित्सक अभ्यास"

-:: संशोधक ::-

राजकुमार प्रकाश महाजन

‹´Ö.‹. ‡×ÜÖÆÖÃÖ, ×›ü.‹›ü

मार्गदर्शक

प्रा. डॉ. व्ही. व्ही. कदम

(‹´Ö.‹.‹´Ö.×±úû»Ö., ¯ÖßÞ‹“Ö. ›üß.)

विभाग प्रमुख

¯Ö¤ü¾ÖßÞ ¾Ö ¯Ö¤ü¾µÖÖ¢ÖÖ¸ü ‡×ÜÖÆÖÃÖ

हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर जि. नांदेड

सन 2017

C6/E/am/MAHAJAN SIR

प्रस्तावना : -

MTDC - MAHARASHTRA TOURISM DEVELOPMENT CORPORATION हे कार्यालय महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ विभागाच्या अखत्यारित कार्यरत आहे. पर्यटन ही बाब मुलभूत गरजांबरोबरच महत्वाची आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात बौध्दीक तसेच शारिरीक काम करणाऱ्या व्यक्तीच्या मनावर आलेला ताण कमी करण्यास पर्यटनाची मदत होते.

नेहमीची जागा बदलुन काही दिवस कामामुळे आलेला ताण कमी करण्यासाठी मनाला शांतता देणाऱ्या ठिकाणी राहणे म्हणजे पर्यटन. अशी थोडक्यात पर्यटनाची व्याख्या करता µÖ‡»Ö. नवनविन ठिकाणी जाणाऱ्या परंतु त्याठिकाणी एका वर्षापेक्षा कमी दिवस राहणाऱ्या व्यक्तीला पर्यटक असे म्हणतात.

प्रत्येक देशाचा स्वतंत्र इतिहास असतो. अगदी प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेल्या अनेक वास्तू, भौतिक पुरावे या इतिहासाची ओळख देत अजुनही उभ्या असलेल्या दिसतात. महाराष्ट्रात असलेल्या जवळपास 800 गुंफा किवा लेणी प्राचीन काळापासून या भूमीवर माणसांच्या वास्तव्याची साक्ष देतात. औरंगाबाद जवळ असलेल्या अजंठा येथील 32 लेणी ही बौध्द काळात घडवली गेलेली आश्चर्यच आहेत. गौतम बुध्दांची शिल्पे आणि जातक कथांवर आधारित कथन शिल्पे यांनी सजलेल्या या गुंफा बौध्द काळातील अत्युत्कृष्ट कलाकृती म्हणून ओळखल्या जातात. अत्यंत वैभवशाली कलेचा वारसा सांगणाऱ्या या कलाकृती यांच्या वैशिष्ट्यांमुळे आजही वेगळया उठून दिसतात. वेरुळ येथे असलेल्या 34 लेणी या अंदाजे 1500 वर्षापूर्वी राष्ट्रकुट राज्यांच्या काळात तयार झाल्या. चरणाद्री डोंगराचा उभा भाग फोडून या गुंफा खोदल्या गेल्या. इथे बौध्द, जैन तसेच हिंदू धर्मियाचे विहार आणि मठ आहेत. धर्माच्या माध्यमातून तत्कालीन सामाजिक आणि आर्थिक जीवनाचे पडसाद इथे उमटलेले दिसतात.

महाराष्ट्र प्रदेशाला मोठा सांस्कृतीक व ऐतिहासिक वारसा लाभला आहे. पर्यटनाच्या दृष्टीने विचार केला तर औरंगाबाद जिल्हा खुप समृध्द आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील लेणी तसेच अनेक स्थळांचा संयुक्त राष्ट्राच्या जागतिक वारसा यादीत समावेश झाला आहे.

पर्यटनाच्या दृष्टीने नविन ठिकाणांचा शोध घेवून त्या भागाचा विकास करणे गरजेचे आहे. जेणेकरुन तिथे राहणाऱ्या स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी मिळू शकतील एखाद्या ठिकाणी पर्यटनाचे स्थळ असेल तर त्याठिकाणाचा विकास हा झपाट्याने होवू शकतो सोबतच खालील गोष्टींना ही मूर्त स्वरुप येईल.

- पर्यटनामुळे स्थानिक रोजगार निर्मीती होईल.
- स्थानिक व्यावसायिकतेला चालना आणि उद्योजकतेला वाव मिळेल.
- संस्कृति संवर्धन होईल.

अशा पध्दतीने पर्यटन विकास व्हावा म्हणून पुढील काही तत्व आपल्याला लक्षात घ्यावी लागतील. ती तत्त्व लक्षात घेवून महाराष्ट्रात पर्यटनाची क्षमता पुर्णपणे विकसीत करता µö‡»ö.

- पर्यटन स्थळाचा शोध - महाराष्ट्रात अनेक लोकप्रिय ठिकाणे आहेत. त्याबरोबरच माहिती नसलेलीही अनेक ठिकाणे आहेत. ज्या गावांना पर्यटन विकास करण्यात रस आहे त्यांना आपले ठिकाण नोंदणीकृत करण्याची संधी देवून राज्यातील शक्य तितके पर्यटन स्थळे जगाच्या पर्यटन स्थळाच्या नकाशावर टाकावयास हवेत.
- या प्रत्येक स्थळाचे वर्गिकरण तिथे उपलब्ध असलेल्या सोयी - सुविधा आणि पर्यटन प्रकार अस दुहेरी वर्गिकरण करुन त्यांची विकास योजना बनवावयास हवी.
- प्रत्येक स्थळाची उत्तमरित्या जाहीरात करायला हवी.
- योजनेनुसार आणि स्थानिकांच्या मदतीने प्रत्येक पर्यटन स्थळाचा विकास करायला हवा.
- महाराष्ट्रातल्या पर्यटन स्थळांना भेटी देणाऱ्या राज्यातील व देशातील पर्यटकांचे प्रबोधन करायला हवे.
- पर्यटनासाठी आवश्यक असे मनुष्य बळ राज्यात विकसीत व्हावे म्हणून प्रशिक्षण संस्था सुरु करायला हव्यात.

याचबरोबर, महाराष्ट्रातील पर्यटन क्षमता असलेले प्रत्येक ठिकाण शोधून, तपासून त्याच्या विकासाची योजन आखायला हवी. हे शक्यतो स्थानिकांच्या पुढाकारानेच व्हाव. काही

पहिल्या दर्जाच्या पर्यटन स्थळांचा विकास शासनाच्या पुढाकाराने पण स्थानिकांच्या आणि नागरिकांच्या मदतीने केला जाऊ शकेल.

प्रत्येक पर्यटन स्थळाचे पर्यटन क्षेत्र प्रकारात वर्गीकरण केल जावं. पर्यटन स्थळाच्या प्रकारानुसार एकुण 7 प्रकार विकसीत केले आहे.

- सांस्कृतिक पर्यटन
- यात्रा पर्यटन
- साहस पर्यटन
- शेती पर्यटन
- निसर्ग पर्यटन
- वैद्यकीय पर्यटन
- समुद्रकाठच पर्यटन

महराष्ट्रातील प्रत्येक पर्यटन स्थळ हे वरिलपैकी एका पर्यटन क्षेत्र प्रकारातील †ÃÖÖ¾Ö.

पर्यटन वृध्दीतून आर्थिक समृध्दी आणायला काही गोष्टी अग्रक्रमानं करायल हव्यात, जिथे पहिल्या पासून पर्यटनाचा ओघ आहे ती स्थळ सक्षम करुन मग नविन स्थळांना वर आणण्याच काम करण्यात याव.

प्रत्येक पर्यटन स्थळ तिथे असलेल्या सोयी सुविधानुसार विकसीत करण्यात यावे, जिथे पायाभूत सुविध पुरेशा आहेत ते विकसीत करण्याला प्राधान्य दिल जावं. जिथे पर्यटन क्षेत्र आहे पण पायाभूत सुविधांची सोय कमी आहे त्या स्थळांचा प्राधान्यक्रम दुसरा असावा, आणि ज्या स्थळांना पर्यटन संभाव्य आहे पण पायाभूत सुविधा अजिबात नाहीत ती तिसऱ्या प्राधान्यक्रमान विकसीत केली जावीत.

- पर्यटकांसाठी माहिती केंद्र, तिथल्या राहण्याच्या खाण्याच्या सोयीबद्दल माहिती देणारे, त्या स्थळाच ऐतिहासीक, भौगोलीक महत्त्व दर्शवणारे माहितीपत्रक, चित्रफिती पर्यटकांना उपलब्ध †ÃÖÖ¾µÖÖŸÖ.

- प्रशिक्षित स्थानिक वाटाडे (Guide) उपलब्ध असावेत.
- सर्व आर्थिक श्रेणीतल्या पर्यटकांना परवडतील अशी राहण्याची सोय असावी.
- केंद्र सरकारने सुचविलेल्या निकषांना अनुसरुन भरपूर आणि स्वच्छ सार्वजनिक सुविधा †ÃÖÖ¾µÖÖÝÖ.
- स्थानिक हस्तकला आणि खाद्य विक्रिच अधिकृत केंद्र असावं.
- ठिकठिकाणी पर्यटनस्थळाविषयी माहिती देणारे फलक, उदा. वेळापत्रक, सार्वजनिक सुविधा, दिशांचे महिती फलक इ. असावे.
- योग्य आरोग्यविषयक आणि मलनिस्सारण व्यवस्था असावी.
- पर्यटन स्थळाचा विकास पर्यावरण संवर्धनाच्या चौकटीतून व्हावा.

या सर्व विषयांची सांगड घालत पर्यटन क्षेत्राचा विकास कसा होईल व तो आजतागायत कसा झाला याचा चिकित्सक अभ्यास संशोधकाला करावयाचा आहे. परंतू काही मर्यादा असल्यामुळे संशोधकाने महाराष्ट्र राज्यातील पर्यटन स्थळाची राजधानी म्हणून घोषित असलेल्या 'औरंगाबाद जिल्ह्यातील अ ब क श्रेणी प्राप्त पर्यटन स्थळांचा चिकित्सक अभ्यास.' या विषयाची निवड केली †ÖÆê.

विषयाची निवड :-

महाराष्ट्र राज्यातील बहुतांश जिल्हयांना ऐतिहासिक स्थळांचा वारसा लाभला आहे. त्या दृष्टीने त्या स्थळांचा विकास घडवून आणने ही तेवढेच महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्हा हा पर्यटनाची राजधानी म्हणून ओळखला जातो. येथील 10 स्थळांना युनेस्कोने जागतिक वारसा यादीत महत्वाचे स्थान दिलेले आहे, 44 स्थळांना राज्य शासनाने ब दर्जा प्राप्त करुन दिला आहे. तर जिल्हा नियोजन समितीने 29 स्थळांना क दर्जा मिळवून दिला आहे. पर्यटनाचा ओघ वाढल्यास परदेशातून येणारे पर्यटक हे पर्यायाने देशाच्या आर्थिक तिजोरीत भरच घालत असतात. एक पर्यटक सात लोकांना रोजगार मिळवून देवू शकतो, त्या अनुषंगाने पर्यटनाचे महत्त्व विषद करणे / ऐतिहासिक वारसा प्राप्त स्थळांतर प्रकाश टाकणे / पर्यटन स्थळाना मिळणारा निधी / खर्च

होते असलेल्या बाबी / स्वच्छता / सुविधा यांचा अभ्यास करणे. तसेच ब वर्गातील पर्यटन स्थळे अ दर्जात आणण्यासाठी व क दर्जाची स्थळे ब दर्जात आणण्यासाठी कोणकोणत्या बाबीची पुर्तता करावी लागेल याचा चिकित्सक अभ्यास करण्याच्या हेतूने “ औरंगाबाद जिल्ह्यातील अ, ब, क, श्रेणी प्राप्त पर्यटन स्थळांचा चिकित्सक अभ्यास” हे संशोधन कार्य हाती घेण्यात आले आहे. सदर संशोधनाची उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत .

^x§Â™µÖ :-

1) औरंगाबाद जिल्ह्यातील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या स्थळांवर प्रकाश टाकणे.

2) पर्यटन स्थळाच्या विकासासाठी केंद्र व राज्य सरकारकडून मिळणाऱ्या निधीचा आढावा घेणे.

3) अर्थ व्यवस्था वाढीसाठी पर्यटना अंतर्गत पर्यटकांना देण्यात येणाऱ्या सोयी - सुविधांचा अभ्यास करणे.

4) औरंगाबाद येथील लेण्यातील बौध्द वास्तुशास्त्र, भित्तीचित्रे, चैत्यदालने, प्रार्थनागृहे, विविध शिल्पकलेचा अभ्यास करणे.

5) श्रेणी प्राप्त पर्यटन स्थळांना मिळालेल्या दर्जाची चिकित्सा करणे.

6) प्राचिन स्थळांना लाभलेल्या ऐतिहासिक वारशाची माहिती मिळविणे.

7) पर्यटन स्थळाच्या भोवतालच्या परिसरातील तसेच तेथिल स्थानिक लोकांच्या समस्या जाणून घेवून त्याचे निराकरण करण्यासाठी प्रयत्न करणे.

8) तिर्थक्षेत्र असलेल्या पर्यटन स्थळाच्या ठिकाणी अस्वच्छता होवू नये म्हणून मार्ग सुचविणे / स्थानिकांच्या मदतीने उपाययोजना करणे.

9) पर्यटन क्षेत्रांच्या ठिकाणी असलेल्या हिंदू, जैन व बौद्ध मुर्ती शिल्पांचा शोध घेणे व त्याचा अभ्यास करणे.

10) पर्यटन स्थळांच्या ठिकाणी असलेल्या बांधकामाच्या अभ्यासावरुन विविध राजवटीतील स्थापत्य शैलीचा अभ्यास करुन त्यावर प्रकाश टाकणे.

गृहितके :-

1) गुप्तकाळ, सातवाहन, वाकाटक, राष्ट्रकुट, तुघलक, मुघल या राजवटींच्या काळात औरंगाबाद येथील अनेक स्थापत्य कला व शिल्पकलेचा विकास झाला आहे.

2) औरंगाबाद जिल्हा हा पर्यटनाच्या दृष्टीने ऐतिहासिक वारसा लाभलेला जिल्हा आहे.

3) पुरातत्वीय पर्यटनाचा विकास करणे ही काळाची गरज आहे.

4) ऐतिहासिक पर्यटनामध्ये पुरातत्वीय स्मारकांचा महत्वाचा वाटा आहे.

5) पुरातत्वीय साधनांना स्वंयपुर्णतेच्या मार्गावर आणणारे एकमेव साधन म्हणजे पर्यटन होय.

6) पर्यटनाच्या विकासातूनच अनेकांच्या उपजिवेकेची नविन साधने निर्माण होतात.

7) पर्यटनामुळे स्थानिक लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध होते.

8) वेरुळ, अजिंठा, एलोरा, बिबी का मकबरा येथिल शिल्पकलेत तत्कालीन कलाकरांनी जिवंतपणा आणला आहे.

9) बौध्द,हिंदू व जैन धर्मियांच्या धार्मिक, भावनांचा येथील स्थळांशी संबंध आहे.

10) जगातील झपाट्याने वाढणारे एकमेव शहर म्हणून औरंगाबादची ओळख आहे.

11) ऐतिहासिक पर्यटन स्थळांच्या माध्यमातून इतिहासाचा अभ्यास करता येतो.

12) ऐतिहासिक पर्यटन स्थळांच्या अभ्यासातून पर्यटनाचे महत्त्व लक्षात येते.

13) पर्यटनाचा ऐतिहासिक दृष्टीकोनातून अभ्यास केल्यास पर्यटनाचा विकास साधता येतो.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-

औरंगाबाद जिल्हा हा पर्यटनाची राजधानी म्हणून नावलौकिक झालेला जिल्हा आहे. अनेक प्राचीन / मध्ययुगीन काळातील ऐतिहासिक वारसा लाभलेली स्थळे या ठिकाणी पहावयास मिळतात. पंरतू त्यापैकी फक्त अ-ब-क श्रेणी प्राप्त पर्यटन स्थळांचाच सखोलपणे चिकित्सक अभ्यास संशोधकाने या ठिकाणी केल्यामुळे सदर संशोधनाला नेमकेपणा येणार आहे.

1) सदर शोध प्रबंधाची व्याप्ती ही औरंगाबाद जिल्ह्यातील अ दर्जाची पर्यटन स्थळे / राज्य शासनाद्वारा घोषीत ब दर्जाची पर्यटन स्थळे तसेच जिल्हा नियोजन समितीद्वारा घोषित क

¤•ÖÖ¯ÖÖ¯ÖÖ Ã£ÖÔ³Ö¯Ö¸üÖß ´ÖµÖÖ×¤üÖ †ÃÖ»Öê.

2) ऐतिहासिक वारसा लाभलेले औरंगाबाद शहर व औरंगाबाद जिल्ह्यामधील 08 तालुके औरंगाबाद, खुल्ताबाद, पैठण, गंगापुर, वैजापूर, कन्नड, फुलंब्री, सोयगांव इत्यादी ठिकाणच्या पर्यटन स्थळाच्या अभ्यासापुरतीच मर्यादित आहे.

3) औरंगाबाद विभागातील महाराष्ट्र पर्यटन (MTDC) च्या अभ्यासापूरती या शोध प्रबंधाची निमीर्ती आहे.

संशोधन पध्दती :-

‘प्रस्तुत संशोधनाकरीता ऐतिहासिक संशोधन पद्धतीमधील पुढील तीन पद्धतींचा अवलंब या ठिकाणी करण्यात आला आहे.

1) सर्वेक्षणात्मक पद्धत

औरंगाबाद जिल्ह्यातील अ-ब-क श्रेणी प्राप्त पर्यटन स्थळांचा चिकित्सक अभ्यास या विषयाच्या संशोधनाकरीता सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग केला आहे. औरंगाबाद जिल्ह्यात विविध राजवटींच्या काळातील ऐतिहासिक वास्तू, मंदीरस्थापत्य, मुर्तीशिल्प व प्राचीन अवषेश मोठया प्रमाणात आहेत या अवषेशांचे ऐतिहासिक दृष्टीकोनातून सर्वेक्षण करण्यात आले आहे. या सर्वेक्षणातून मिळालेल्या माहितीच्या आधारे प्रस्तूत संशोधन कार्य पुर्ण करण्यात येणार आहे.

2) प्रत्यक्ष मुलाखत पद्धती

औरंगाबाद जिल्हा हा पर्यटनाची राजधानी म्हणून ओळखला जातो. अजिंठा लेणी, ऐलोरा लेणी, प्राचीन मातीचा किल्ला, सोनेरी महल, म्हैसमाळ, दौलताबाद यांसारखे अनेक प्रेक्षणिय स्थळे या ठिकाणी पहायला मिळतात. संशोधनाच्या दृष्टीकोनातून अ-ब-क श्रेणी प्राप्त पर्यटन स्थळांबद्दलची माहिती त्यांचा विकास, भारत सरकार कडून पर्यटन विकासासाठी मिळालेला निधी, त्यांचे नियोजन, व्यवस्थापन, सुविधा, समस्या, व इतर इत्यादींच्या माहिती करीता प्रत्यक्ष मुलाखत या पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

3) संदर्भ संशोधन पध्दती

औरंगाबाद जिल्ह्यातील अ,ब,क श्रेणी प्राप्त पर्यटन स्थळांचा चिकित्सक अभ्यास या विषयावरील संशोधनासाठी संदर्भ संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. सदर संशोधनात प्राथमिक आणि दुय्यम संदर्भ ग्रंथाचा उपयोग करण्यात आला आहे. याशिवाय औरंगाबाद जिल्हा गॅझिटर, पुरातत्वीय अहवाल, महाराष्ट्र अनलिमिटेड आणि इतिहास संशोधन पत्रिकांचाही आधार घेतला आहे. वरील तिन्ही पध्दतीचा वापर करुन संशोधन कार्य पुर्ण करण्यात येणार आहे.

संशोधन प्रबंधाचा संकल्पित आराखडा :-

प्रकरण पहिले

औरंगाबाद जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी

2) प्रकरण दुसरे

व्याख्या - प्रकार - सुविधा - MTDC चे कार्य - विकासातील अडथळे.

3) प्रकरण तिसरे

"†" वर्ग पर्यटन स्थळे

औरंगाबाद जिल्ह्यातील अजिंठा, एलोरा सह इतर 8 लेण्यांना अ दर्जा प्राप्त झालेला आहे. सदर लेण्यांचे संवर्धन व पर्यटन दृष्ट्या सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने अनेक पावले उचलण्याची गरज आहे. यासाठी एक उपाय योजना म्हणून अजिंठा वेरुळ संवर्धन पर्यटन विकास टप्पा 1 साठी जानेवारी 1992 मध्ये जपान सरकार व केंद्र शासन यांच्या मध्ये कररनामा झाला होता. या टप्प्यातील कामे पुर्ण करण्यासाठी 128 कोटी रुपये खर्च झाले होते अशा जिल्ह्यातील युनेस्कोद्वारा घोषित world Heritage Site व अ दर्जा प्राप्त स्थळांची ऐतिहासीक पार्श्वभूमी, त्यांना मिळणारा निधी, खर्च होत असलेल्या बाबी, स्वच्छता, सुविधा, पर्यटकांची वर्दळ इत्यादी बाबींचा अभ्यास पहिल्या प्रकरणात करण्यात येणार आहे.

3.1 अजंठा लेणी

3.2 औरंगाबाद लेणी

3.3 रबिया दुर्राणी ची समाधी (बिबी का मकबरा)

3.4 दौलताबाद किल्ले (चांदमीनार)

3.5 ऐलोरा लेणी

3.6 औरंगजेब समाधी

3.7 मलीक अंबर समाधी

3.8 प्राचीन मातीचा किल्ला

3.9 पितळखोरा लेणी

3.10 घृष्णेश्वर मंदीर

4) **प्रकरण चौथे**

“²Ö” वर्ग पर्यटन स्थळे

महाराष्ट्रातील पर्यटन क्षमता असलेले प्रत्येक ठिकाण शोधून पर्यटनाच्या दृष्टीने त्यांची विकास योजना आखणे महत्वाचे ठरते. औरंगाबाद जिल्ह्यामध्ये राज्य शासनाद्वारा घोषित सोनेरी महल, दिल्ली दरवाजा, पानचक्की, यांसारख्या व इतर एकूण 44 स्थळांना ब दर्जा प्राप्त झालेला आहे त्या स्थळांचा त्यांचा इतिहास, विकास निधी इत्यादी बाबतचा सविस्तर अभ्यास या प्रकरणा मध्ये करण्यात येणार आहे.

4.1 सोनेरी महल

4.2 ¿ÖÆÖ´Ö•Ö ´ÖÛÃ•Ö¤

4.3 »ÖÖ»Ö ´ÖÛÃ•Ö¤

4.4 काली मस्जिद

4.5 चौक मस्जिद

4.6 भडकल दरवाजा

4.7 मकाई दरवाजा

4.8 नौखंडा पॅलेंस

4.9 ׫»»Öß ¤¸¾ÖÖ•ÖÖ

4.10 पानचक्की

5) प्रकरण पाचवे

"क" वर्ग पर्यटन स्थळे

एकूण उत्पादनापैकी 9 टक्के उत्पदान हे पर्यटन क्षेत्रातून प्राप्त होते. 11 रोजगारांपैकी 1 रोजगार हा पर्यटनावर अवलंबून आहे.

प्रत्येक स्थळाला ऐतिहासीक वारसा लाभला आहे. औरंगाबाद जिल्ह्यात पर्यटनाच्या दृष्टीकोणातून खुलताबाद, नाथ उद्यान अशा व इतर 29 स्थळांना जिल्ह्या नियोजन समितीने क ¤•ÖÖ ÃÖÖšß ¯ÖÖ¡Ö š¸ü×¾Ö»Ö †ÖÆê.

संशोधकाने ऐतिहासिक पार्श्वभूमीवर क दर्जा प्राप्त स्थळांचा अभ्यास सदर प्रकरणात केलेला आहे.

5.1 खुल्ताबाद

5.2 ´ÆÃÖ´ÖÖô

5.3 नाथ उघान

5.4 ¤Ö»ÖŸÖÖ²ÖÖ¤

5.5 ØÖ¯ÖÖôÖ¬Ö¸ß

5.6 देवगिरी

5.7 ¯Ö•ÖÖ ×¾ÖÆÖ¸

5.8 श्री क्षेत्र कचनेरला

5.9 गंगापूर

5.10 नगरचा किल्ला

6) प्रकरण सहावे

पर्यटन स्थळांचे व्यवस्थापन, विकास, समस्या

या प्रकरणात संशोधकाने औरंगाबाद जिल्ह्यातील अ,ब,क श्रेणी प्राप्त पर्यटन स्थळाच्या विकासाच्या माहितीचा आढावा घेतला आहे. तसेच येथील ठिकाणांना भेटी देऊन व्यवस्थापन, समस्या व इतर गोष्टींचा संपूर्ण अभ्यास केला आहे.

7) प्रकरण सातवे

निष्कर्ष

7.1 प्रकरणनिहाय सारांश

7.2 ठळक निष्कर्ष

7.3 सैद्धांतिक मांडणी

7.4 नवे सूत्र

7.5 ^¯ÖÃÖÆÖ¸ü

-:: संदर्भ ग्रंथ सुची ::-

1) **Gazetter of Aurangabad - H.H.The Nizams Government 1884 (Chapter IX, Page 805 To 877)**

2) देशपांडे पि.एस., सावंत रमेश (1998) नकाशा जनरल नॉलेज - महाराष्ट्र समर्थ उद्योग प्रकाशन.

3) माळी के. एम. (1974) यादव कालीन महाराष्ट्र

4) मांडलीक प्रा. चंद्रकांत (1995) आपला महाराष्ट्र - श्रधा साहित्य पुणे

5) अजिंठा लेण्या - भारत संपूर्ण वर्णन - युनेस्को जागतिक वारसा स्थळे (2006)

6) भारत पर्यटन मंत्रालय - वार्षीक अहवाल - 2014-2015

7) भारत पर्यटन मंत्रालय - वार्षीक अहवाल - 2015-2016

8) भारत पर्यटन मंत्रालय - वार्षीक अहवाल - 2016-2017

9) अतुल्य भारत - मासिक - ऑक्टो - डिसें. 2016

10) अतुल्य भारत - मासिक - जानेवारी - मार्च 2017

11) लेणी महाराष्ट्रांची - दळवी दाउद - 2004 मुंबई

12) अजिंठा लेण्या - भारत By UNESCO

13) ऐलोरा लेण्या - भारत By UNESCO

14) ऐलोरा लेणी महाराष्ट्र - भारताचा पुरातत्वीय अहवाल

15) इयत्ता तिसरीचे औरंगाबाद जिल्हयाचे भूगोल विषयाचे पाठयपुस्तक

16) औरंगाबाद एन.आय.सी.

17) दैनिक लोकसत्ता मधील पर्यटन विषयक लेख

18) www.maharashtratourism.gov.in/destination/aurangabad

19) पर्यटन एक संजीवनी - डॉ. लीली जोशी

20) प्रेक्षणीय महाराष्ट्र संग्रहय पर्यटन - विशेषांक

21) मराठवाडयाचा इतिहास - डॉ. कठारे अनिल व डॉ. नगराळे एन.एस.

संशोधक	मार्गदर्शक
राजकुमार प्रकाश महाजन	प्रा.डॉ. व्ही. व्ही. कदम
(‹´Ö.‹. ‡×ŸÖÆÖÃÖ, ×›ü.‹›ü)	(‹´Ö.‹.,‹´Ö.×±ú»Ö., ¯Öß‹“Ö. ›ß.)
	(इतिहास विभाग)